
# एक आहे अनिकेत



संजय येरणे

साहित्य प्रतिष्ठान

या पुस्तकातील लेखनाचे सव हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनमुद्रण व नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे . तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते .

प्रकाशक -- ई साहित्य प्रतिष्ठान

संपादक -- अनघा हिरे (9422284116)

www.esahity.com

esahity@gmail.com

प्रकाशन

विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध

आपले वाचून झाल्यावर आपण फॉरवड करू शकता

हे पुस्तक वेबसाईट वर ठेवण्यापूर्वी किंवा वाचना व्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापूर्वी ई साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी आवश्यक आहे.

# चरित्रात्मक बालकथा :
# एका अर्धवट जीवनाची अर्धवट कहाणी ..........

## एक आहे
## अनिकेत

*संजय वि. येरणे*

**मनातलं –**

शिक्षणाची संकल्पना बदलली आनंदमयी शिक्षणातून गंमत जंमत खेळागत शिक्षणाची धुरा सुधारण्यात आली. मी प्राथमिक शिक्षक मनानेच झालो. लहान असतांना वाटायचं, सर आपल्याला शिकवतात म्हणजे ते किती हुशार असतात बरे ! त्यांना खूप ज्ञान असेल नाही का? ह्या बालपणातल्या न उमजलेल्या गोष्टिनेच शिक्षकी सेवेचं व्रत स्वीकारायचं ठरलं. पण सुरवातीला जो उत्साह उमेद ह्या सेवेत होती ती काही टिकली नाही. शिक्षण सेवा न राहता व्यवसायाचं रूप बनलं. राजकीय, शासकीय प्रणालीने शिक्षणाचा विकास करतानांच त्यात भरपूर सुधारणा घडवल्या पण कार्य कुशलता नसणे, स्वार्थ हेवेदावे ह्यातून गंभीर बाबी दिसू लागल्या. प्रशासनही ह्याला जबाबदार धरावं काय? वड्याचे तेल वांग्यावर कदाचित यामुळेच मी हिरमुसायचा.

तन्मयतेतून मी मनातल्या भावनांचा अंतरंगाचा विचार करतोय. नव्या कल्पना राबवण्याचा प्रयत्न करतोय. कथा, कविता कादंबरी, लेख खूप काही मनात येतं ते लिहितोय. बरचसं लेखन पडून राहिलं. त्याला कारणही बरीचशी, आर्थिक बाब आम्हासारख्या उकीरड्यावर जन्माचं दारिदय घेवून जन्मलेल्या व्यक्तिला तर नेहमी करीताच...याच समस्या गंभीर तर इतर भारतीय बांधवाचं, विद्यार्थ्यांच काय?

यातूनच एक आहे अनिकेत बालकथेचं लेखन केलेलं आहे. अनिकेत माझा विद्यार्थी, त्याचे गुणकौशल्य, चांगुलपणा याचं सर्वांनीच कौतुक केलं. मीही त्याचं बारकाईने निरीक्षण केलं.

त्याला बोलकं केलं. गट्टी जमवली आणि त्याची कहाणी त्याच्याच शब्दात मांडण्याचा हा प्रयत्न.

इथल्या कथापूर्ण बाबी प्राथमिक शिक्षण काहातील मोजकयाच घटना घेवून चित्रित झाल्या आहेत. उद्देष हाच की, इतर विद्यार्थ्यांमध्ये नवगुण, चांगुलपणा यावा. नवे विचार, नवं ज्ञान, नवी दिशा, दृष्टी त्यांना लाभावी. त्याच्या आई–बाबांनी, शाळेतील शिक्षकांनी बरचसं सांगीतलं. याचमुळे एका इवल्याश्या जीवाचं चरित्ररूपी कथानक समोर आलं.

बालकांना, पालकांना काहीतरी चांगलं मिळावं, नवी दिशा, सृजनशिलता निर्माण होण्यास्तव आपणा सर्वांकरीता एक आहे अनिकेत रूपी एका अर्धवट जीवनाची अर्धवट कथा......

**ई साहित्य टिम** व त्यांनी केलेली ही प्रकाशन सहकार्य मदत यांचा ऋणी आहे.

# *अर्पण* –

तुझ्याशी कोणते ऋणानुबंध जुळले मलाही कळलं नाही. तुला प्रत्येक क्षणी पाहतांना मनाला दिलासा मिळायचा अनिकेत तुझी कहाणी तुलाच...

बाबा रमेश झाडे, आई सौ. शारदा झाडे दादा सौरभ झाडे यांना स्नेहपूर्वक.........


लेखक–

संजय वि. येरणे,

नागभीड. जि. चंद्रपूर

मो..9404121098

## परिचय :

: संजय विस्तारी येरणे.



**पत्ता :** 'येणू भिकाजी' सदन, वार्ड नं. 6, शिवाजी चौक, मु. पो. तह. नागभीड. जि. चंद्रपूर. पिन 441205, संपर्क – 9404121098.

**शिक्षण :** एम. ए. (मराठी, समाज, डॉ. आंबेडकर थॉटस्)

डी. एड, डी. एस. एम.

**जन्म :** 19 नोव्हेंबर 1976

**व्यवसाय :** प्राथमिक शिक्षक, नागभीड. जि. चंद्रपूर

**प्रकाशित साहित्य :**

1) चारोळी : 'काटेरी निवडुंग' भरारी प्रकाशन, नागभीड. 2008

2) कथासंग्रह : 'डफरं' मायबोली प्रकाशन, मुंबई, 2014

3) वैचारिक ग्रंथ : 'सूडाचा प्रवास' भरारी प्रकाशन, नागभीड. 2014

4) कवितासंग्रह : 'जागल' भरारी प्रकाशन, नागभीड. 2011

5) बालकथासंग्रह : 'एक आहे अनिकेत' (मराठी व इंग्रजी आवृत्ती) भरारी प्रकाशन, नागभीड. 2012

6) समीक्षाग्रंथ : 'ना. गो. थुटे यांच्या चारोळी कवितेची समीक्षा'
श्रेयस प्रकाशन, हिंगणघाट, 2014

7) समीक्षाग्रंथ : 'काव्यफुलांचे अंतरंग' डॉ. राजन जयस्वाल यांची कविता,
भरारी प्रकाशन, नागभीड. 2014

8) शैक्षणिक : ‘संजय येरणे इंग्लिश पॅटर्न’ भरारी प्रकाशन, नागभीड. 2016

9) काव्यसंपादन : 1. अंगार 2. उधान 3. आरसा.
भरारी प्रकाशन, नागभीड.

9) कादंबरी : संताजी जगनाडे एक योद्धा, भरारी प्रकाशन, नागभीड 2016

9) संपादन : घाण्याचे अभंग, पुस्तिका भरारी प्रकाशन, 2016

**साहित्यविशेष :**

1) लेखक, कथाकार, कादंबरीकार, कवी, संपादक, प्रकाशक, वक्ता म्हणून परिचित.

2) अनेक वाड्.मयीन नियतकालिकांतून, वृत्तपत्रातून लेख, कथा, कविता प्रसिद्ध.

3) संस्थापक–अध्यक्ष : भरारी साहित्य शिक्षण कला सेवा संस्था. ज. तु. सा. प. द्वारा साहित्य कार्य, समाजसेवा, बहुजन चळवळीचे कार्य, साहित्यसंमेलन आयोजन, कवीन आयोजन, नवोदितांना साहित्य मार्गदर्शन, शैक्षणिक चळवळ व संघटनात्मक कार्य, अनेक संस्था व संघटनांचा पदाधिकारी. अनेक संमेलनात कविता वाचन तथा कथा सादरीकरण. शैक्षणिक मार्गदर्शन.

**पुरस्कार :**

शिक्षण गौरव सन्मान, विदर्भ युवा गौरव सन्मान, कर्मवीर भाऊराव पाटील सन्मान, अंतरंग सन्मान, म. फुले राज्यस्तरीय शिक्षक सन्मान, बौद्धसमाज पंचकमेटी सन्मान, सर्वज्ञ साहित्यरत्न पुरस्कार तथा विविध साहित्यिक, शैक्षणिक, सामाजिक संस्थाकडून सन्मानित. तेली समाज नवखळा, नागभीड, ब्रम्हपुरी, तळोधी, भिसी, नेरी कडून समाजभूषण सन्मान.

**विशेष पुरस्कार :**

1) ‘डफरं’ या कथासंग्रहास स्व. वसंतराव दांदळे स्मृती राज्यस्तरीय मराठी

वाड्.मय पुरस्कार 2015 डॉ. विठ्ठल वाघ यांचे हस्ते साद बहुद्देशीय संस्था, अकोला द्वारा दि. 20 डिसेंबर 2015. ला प्राप्त.

2) ‘डफरं’ कथासंग्रह व ‘सूडाचा प्रवास’ वैचारिक ग्रंथास राज्यपुरस्कार अंकुर साहित्य संघ, महाराष्ट्र द्वारा 55 वे अखिल भारतीय अंकुर मराठी साहित्य संमेलन अकोला येथे डॉ. फुला बागूल संमेलनाध्यक्ष यांचे हस्ते प्राप्त. दि. 28 ऑगष्ट 2016.

3) ‘ना. गो. थुटे यांच्या चारोळी कवितेची समीक्षा’ या समीक्षाग्रंथास तिसरे राज्यस्तरीय रसिकराज मराठी साहित्य संमेलन नागपूर. श्री विश्वास पाटील संमेलनाध्यक्ष यांचे हस्ते पुरस्कार प्राप्त. दि. 20 मार्च 2016.

4) कथास्पर्धेत प्रथम पुरस्कार अंकुर साहित्य संघ गडचिरोली द्वारा दि. 12 मार्च 2016.

5) जिल्हास्तरीय काव्यस्पर्धा पुरस्कार 2014 नक्षत्राचं देणं काव्यमंच पुणे, जिल्हा शाखा चंद्रपूर द्वारा दि.23 ऑगष्ट 2014.

6) राजेश्वरजी बोढे स्मृती साहित्य साधना पुरस्कार, राष्ट्रसंत विचार साहित्य परिषद केंद्रीय समिती चंद्रपूर द्वारा कढोली, पिंपळगाव येथे प्रदान. 10 जानेवारी 2016.

7) विदर्भ तेली समाज महासंघ शाखा नवखळा, येथे दि. 8 डिसेंबर 2016 ला ‘संताजी जगनाडे एक योद्धा’ या कादंबरीचे प्रकाशन तथा शाखा नवखळा वतीने समाजभूषण पुरस्कार देवून गौरविण्यात आले. डॉ. क्रिष्णा देव्हारे सर यांचे वतीने.

8) दि. 11 डिसेंबर 2016 ला विदर्भ तेली समाज महासंघ शाखा नागभीड द्वारा तेली समाजभूषण पुरस्कार देवून गौरविण्यात आले. प्रा. रमेश पिसे यांचे हस्ते.

तथा येरडेंल तेली समाज ब्रम्हपुरी वतीने दि.18 डिसेंबर 2016 ला पुष्पगुच्छ द्वारा अभिनंदन व दि. 25 डिसेंबर ला विदर्भ तेली समाज शाखा ब्रम्हपुरी द्वारा अभिनंदन करण्यात आले. तसेच निवाडा साप्ताहिक द्वारा अतिथी संपादक म्हणून प्रशस्तीपत्र तसेच तळोधी (बा). ब्रम्हपूरी, भिसी, नेरी येथेही समाजसन्मान.

9) वस्ताद लहूजी साळवे ट्रस्ट गुंधा. जि. बुलढाणा द्वारा 'डफरं' या कथासंग्रहास राज्यपुरस्कार दि. 27 नोव्हेंबर 2016

10) दुसरे अभंग साहित्य संमेलन राजुरा द्वारा प्रशस्तीपत्र दि. 18 डिसेंबर 16.

11) द. सा. बोरकर स्मृती साहित्य पुरस्कार 'काव्यफुलाचे अंतरंग' या समीक्षाग्रंथास 24 वे झाडीबोली साहित्यसंमेलन राका पळसगाव जि. गोंदिया येथे.

12) 7 वे ग्रामीण मराठी साहित्य व लोककला संमेलन सावरला येथे दि. 1 एप्रिल 2017 ला मराठी वाड्.मय पुरस्कार 'संताजी जगनाडे एक योद्धा' या कांदबरीस.

11) मनापासून मनापर्यंत या कथास्पर्धेत राज्यस्तरीय पुरस्कार सेवाव्रती या कथेस डफरं कथासंग्रहात समावेशित कविता. दि. 28 मार्च 2017.

0000

**मी** अनिकेत, माझ्या हद्यातील भावनांचा आंर्त विचार करीत असतांना माझं मन सैरभर धावू लागलं. तशातच अंकुरातून फुटलेली अनुभवांती मी आपणासमोर मांडतोय.

पण, ''मित्रांनो, मी म्हणजे कोण?'' त्याचा विचारही तुम्ही करू नका. मी कुणिही नाही. शरीराने, हाडाने, मासाने, रचलेला एक सांगाडा एवढंच. जेमतेम बारा तेरा वर्षाचा तरीपण माझ्या मनात खूप विचार येतात. माझ्या मनातील विचार भावना तुम्हासही कळाव्यात असं मला नेहमी वाटतं. साहजिकच आहे ते. कारण तुम्ही माझे सोबती, गुरूजनांनी शिकवलेलं एक वाक्य मला आठवतं. "हे विश्वची माझं घर".

मग मला तुम्हाला सांगण्याचा हक्क आपोआप प्राप्त झालेला आहे. असच मला वाटतं.

मी खुप मोठा आहे, छे! असला विचार कधी तुम्ही करू नका! अगदी माणसानं मधमाशी सारखं व्हावं. असाच प्रयत्न मी माझ्या जीवनात करणार आहे.

आमचं घर बाबा, आई, आजी, दादा आणी मी, बस एवढंसच! त्यांनीच मला दिशा दिली. मला मात्र दशा कधीही अनुभवायला मिळाली नाही. तरीपण खूप काही कळलयं मला. माणसाने अंर्तमुख व्हायला पाहिजे. ऐकुन घ्यायला पाहीजे. आणि विचार करायला हवा. एवढंच आजतागत कळलं.

थोर आता कुणीही बनू शकत नाही. पण थोरांच्या पायातील धुळीचा कण बनायचं, असा निर्धार करायला हवा. सराकडून ऐकलं होतं. त्यावर विचार करू लागलो. आजतागत विचार चालू आहे. अनंत आसमंतात विचारांच अफाट चक्र फिरतच राहणार. कधी कदाचित एखाद्या चक्रव्युहात हा मानवी देह अडकणार. अभिमन्यू अपयशी ठरला,

पण मित्रांनो आपल्याला आधुनिक जीवनाचं चक्रव्यूह भेदून काढायचं आहे.

00

मी अगदी आंनदांने उडया मारल्या. माझं मलाच कळत नव्हतं. आनंदाला उधान आलं. पण “विजयाचा आनंद संयमानं घ्यायला पाहिजेत” असं सुद्‌धा मी सुविचारातून शिकलो आहे.

आई मला गोलूच म्हणायची, नेहमी, छान वाटतं नाही का हे नाव? मात्र बालपणी बरं वाटतं ! मोठं झाल्यावर कुणी गोलू म्हटलं तर... जाऊ दे, आतापासून कशाला विचार करायचा.

हं! तर विसरलोच होतो. अगदी आनंदात असच सारखं विचार येतो.

आईने मला बोलावलं. मी आईकडे धावतच गेलो. किशोर मासिक उघडून दाखविलं. मला मात्र काहिही कल्पना नव्हती ना! बघतो तर काय? त्यात माझा छापून आलेला फोटो आणि माझा अनुभव.

“एकदा मी रस्त्यांनी जातांना एक लहान मुलगी वाटेतच पडली. पण तिला कुणिही उचलत नव्हतं. ती रडत होती. माझं मन गहिवरलं, त्या मुलीस उचलून तिच्या आई बाबाकडे नेलं. त्यांनी मला शाबासकी दिली.”

एवढंसच छोटं अनुभव, पण पहिल्यांदाच आनंदाश्रू माझ्या डोळयातून तरळले, आपला फाटो अगदी अल्पवयात शुल्लकशा कारणामुळे छापूण येईल असं कुणाला वाटतं. मी ही त्यातलाच समजा.

मी हुशार आहे, असं सारेच म्हणतात. एवढच नाहितर सर्व शिक्षकवृंदाचं माझ्यावर अपार प्रेम आहे. त्यालाही कारण आहे बरं का!

मी माझ्याच मॅडमचा मुलगा. मग कौतुक होणार नाही तर काय? पण मला मात्र ते कौतुक नको आहे. आपल्यात गुण असतील तरच कौतुक

व्हावं. जावू द्या! मला मात्र यातलं काहीच कळत नाही. बरं ! बाकीची शाळेतली मुलं हुशार नाहीत का?

माझं गाव अगदी छोटसं, चार–पाच गावची मुलं शिकायला येतात. काही मुलं तर अगदी माझ्यापेक्षाही हुशार, माझे मित्र, माझे संवगडी खूप खूप मजा येते शाळेत. तशी फार मोठी आहे हं माझी बाखर्डी शाळा!

पण त्याचं कौतुक व्हायला पाहीजे, होते सुद्धा! आमच्या शाळेतील माझ्याच गुरूजनाकडून. पण मला मात्र थोडासा जास्तच भाव मिळतो.

मी अंर्तमुख होवून विचार करतोय. सरांनी प्रार्थनेच्या वेळेस विद्यार्थ्यांना माहिती दिली. सर्व मुलांनी टाळयांच्या गजरात स्वागत केलं. पण विचाराचं अफाट चक्र माझ्या डोळयात गुफंत चाललं होतं.

माझ्या शाळेला आजतायगत मिळालेला पहिलाच बहुमान होता तो. साऱ्यांनी माझं कौतुक करावं नाही तर काय? पण मला वाटतं, आपण असेच घडत गेलो पाहीजेत. अगदी कुभांराच्या भट्टीतील मडक्यागत, आपल्याला आकार मिळावा, मला आकार मिळायला सुरवात झाली असच वाटतं. पण आपणही उन्मादाच्या प्रवाहात वाहून न जाता विजयाचा आनंद संयमानं घ्यायला हवा. मी अगदी असाच आहे.

सर आईजवळ नेहमी म्हणतात. “भावनाशिल, संयमशिल, विवेकी आहे तुमचा मुलगा!”

मला तरी कुठं कळतं यातला अर्थ, का? तर आम्ही खेड्यातली मुले, शहरातील मुला इतपत अनुभव संस्कार कुठं मिळतात आम्हाला.

परिस्थिती त्याला कारणीभूत ठरतेय. हं! आठवलं म्हणून सांगतोय. “माझे संवगडी खूप गरीब आहेत हो काही. ज्यांना धड कापडंच काय? खायलाही मिळत नाही. अशा परीस्थितीत जगणं, कुठून पुरवायच्या सोयीसुविधा. खुप तारांबळ होते ना त्यांची’’

कधी आई–बाबा बोलत असतात हया विषयावर काहीतरी समजलं तेवढं ऐकुण घ्यायचा मी.

माझ्या नावावर अचानक मनिऑर्डर आली. फक्त पन्नास रूपये मानधन, मला कुठं कळत होतं यातलं. मी आईस दाखवली. तेव्हा कुठं कळलं. मासिकात लिहलेल्या सदराकरीता मला मिळालेलं ते पहिलच मानधन. मी जाम खुष झालो.

आज मला शाळेत कधी पोहचतो याचच वेड लागलं होतं.

तशी मी तयारीही लवकर केली. पण शाळेत जाताच हिरमुसलो. तशी आमच्या शाळेत आठ–नऊ मोठी–मोठी वडाची झाडं आहेत. निर्सगाच्या मुर्तीमंत छायेत वसलेली ती आमची शाळा. ह्या शाळेतील ती खूप जुनी एकोणवीस झाडं आमच्या स्वातंत्र्यपूर्व काळातील गुरूजनांनी लावली म्हणतात. त्यांची अपार सावली आज आम्हाला अनुभवायला मिळते आहे.

"खरच आहे ते! झाडं लावतात कुणीतरी आणी फळ मिळते दुसऱ्यांना."

रस्त्याकडे एकटक पाहात होतो. पण सर लवकर आलेच नाहीत. मला मिळालेल्या बक्षिसाची माहीती सरांना कधी सांगतोय हयाचाच विचार करीत होतो. लगेच माझ्या मित्रांनी मला खेळायला हाक दिली. पण कुठलं मन रमतं खेळण्यात. मी अजिबात खेळायला गेलो नाही. प्रार्थना झाली तरी सर आलेच नव्हते. मी मात्र गप्प. तास सुरू झाला नी सर आले. तेव्हा कुठं मला बरं वाटलं. सर येताच आईने त्यांना कल्पना दिली. पण मला कुठं माहित होतं ते.

सर वर्गात येताच सरांच्या जवळ जावून मी म्हटलं,

"सरजी, मला पन्नास रूपयाचं मनिऑर्डर मिळालं"

"कसलं रे!"

"आपण ते मासिकात लिहलं होतं त्याबद्दल"

"हं छान!"

“सरजी”

मी थोडसं घुटमळलो, सरांशी अशा स्थितीत कसं बोलायचं.

“सरजी हे सारं घडलं ते कुणामुळं घडलं माहितेय का?”

“कुणामुळं?”

“तुमच्याच सौजन्यामुळं.”

सर किंचीतसे हसले, मी ही प्रसन्नपणे हसलो.

त्याच तासाला सरांनी विद्यार्थ्यांना सांगितल, “तुम्ही असच सुदंर लेखन वाचन करा.”

माझं पुन्हा विद्यार्थ्यांनी तीन टाळयांनी स्वागत केलं. मी मात्र सुखावलो होतो. यशाने, अगदी रसाळ फळागत.

सर नेहमी म्हणतात, “अवांतर पुस्तकाचं वाचन करा, माझा विद्यार्थी जेव्हा माझ्यापेक्षा खूप मोठा होईल तेव्हा कुण्या शिक्षकाला धन्य वाटणार नाही.”

एकदा तर चक्क सरांनी सातवीच्या विद्यार्थ्यांना निरोप देण्याप्रसंगी विद्यादानाची भिक मागितली. मला कळतंय, आपल्या विद्यार्थ्यांकडून किती अपेक्षा असतात सरांच्या. पण आमच्या खेडयातल्या मुलांना, पालकांना समजेल तेव्हा ना?

कधी–कधी वाटतं खूप शिकावं, खूप मोठं व्हावं. अगदी द्रोणाचार्यापेक्षाही धनुर्धर, अर्जुन शिष्य म्हणून मोठा झाला ना! तसच सरांनी म्हटलं होतं.

मला माहीत नाही माझ्या प्रारब्धात काय दडलय ते.

सर घरी आले तेव्हा सरांना मी म्हटलं, “सरजी, मी या पैशाचं काहीतरी खाऊ घेवू.”

तसं सरांनी मला मित्रच मानलं होतं. सर माझ्याशी मित्रत्वाने बोलायचे. सुरवातीला मी सरांशी बोलतांना लाजायचो. पण आता

इतरापेक्षाही सरांशी मी मनमोकळया गप्पा मारीत असे. माझ्या घरच्यानांही माहित होतं.

"अरे अनिकेत! आज जिजाऊ जन्मोत्सव, किती छान दिवस ठरला तुझ्यासाठी,''

''बेट्या, आपण या पैशाचं खाऊ घेवू म्हणतोस.''

सर जातांना म्हणाले, "पहिली कमाई खर्च करायची नाही हं! अशीच आठवण म्हणून जपून ठेव. आपल्याला सदैव प्रेरणा देत असते ती. मी सुद्‌धा आठवीत असतांना काम करून कमविलेले पाच रूपये जपून ठेवले होते."

सरांनी मला समजावलं, खुप काही कळतं सरांच्या बोलण्यातलं. मी आत्ताही ते पन्नास रूपये जपून ठेवलेत आईसाक्ष!

00

एके दिवशी आईला म्हणावे की म्हणू नये असाच प्रश्न पडला. पण विचाारल्या शिवाय कुठं मन रमतं.

"आई, एक गोष्ठ विचारू का गं?"

"काय?"

"अगं, आज की नाही आपल्या दुर्गे सरांनी त्या प्रफुल्लला शाळेत गाडी पुसायला सांगितली. त्यानेही मोठया आनंदाने ती गाडी स्वच्छ केली. पण सरांचं बरोबर आहे का गं? आम्ही मुलं शाळेतली बरीच काम करतो, करायलाही पाहीजेत. पण सरांनी गाडी पुसायला लावणं मला नाही पटत ते......"

आई हसली कदाचीत मी विचार करतो म्हणून असेल.

“अनिकेत, प्रत्येक गोष्टीवर विचार करावा लागत नाही. काही लोकांचं आचरण, स्वभाव वेगवेगळा असतो, जाऊ दे, आपल्याला काय करायचयं?”

मी मात्र गप्प बसलो, पण मला नाही पटत गरीबांना कुणी वाकवणं, कुणावर अन्याय करणं, आपण तरी का म्हणून मुकाट्यानं सहन करायचं. आपल्यावर कुणाची तरी कृपादृष्टी असावी या करीताच काय? मला नको ते लाच्छनास्पद जीवन.बरं, तो मुलगा गरीब आहे म्हणूनच त्याला

सांगीतलं. मी मॅडमचा मुलगा आहे, मग मला का नाही सांगीतलं ते काम? असला भेदाभेद............

खुप राग येतो केव्हा–केव्हा तशी आई म्हणते सुद्‌धा,
“तुला खुप राग येतो केव्हा–केव्हा.”

मलाही कुठं कळतं, असं का घडतं ते?

00

आईची माया अपरंपार असते. कथा, कविता अनेक पुस्तकातून वाचायला मिळालं. सरांनी मला सानेगुरूजीचं ‘श्यामची आई’ पुस्तक वाचायला दिलं. मी भराभरा ते पुस्तक वाचुन काढलं. किती चांगली होती ना श्यामची आई!

पहिल्यादांच कळलं मला, साने गुरूजी त्यामुळेच घडलेत. पण मी माझ्या आई बद्‌दल काय सांगावं?

माझी आई सुद्‌धा अगदी तशीच प्रेमळ, मायाळू, दयाळू ..होय! ती शिक्षिका आहे म्हणुनच असेल तिचा स्वभाव.

माझ्या आईचं डोकं दुखणं नेहमीचच. त्यामुळे आईची तब्येत वारंवार बिघडत असते. तेव्हा आईचं घरकाम करणं, डोकं दाबुन देणं, सारं काही

काम मीच करतो. मला सुद्धा आईला मदत करणं आवडतं. आईला नाहीतर कुणाला मदत करायची? आई, बाबामुळे आपण या जगात जगतोय. माझीच आई मला जन्मोजन्मी मिळावी, कुणाला बरं वाटणार नाही?

कधी–कधी आई माझ्यावर रागावते, पण माझ्याच भल्यासाठी ना!

00

मी विद्यार्थी आहे, शिकतोय. पण शिकत असतांना किती अनुभव येतात नाही का? सर आम्हास नव–नवीन माहिती देतात. प्रत्येकच गोष्ट लक्षात राहात नाहीत. पण प्रत्येकच बाबी काळानुसार आठवतात. माझं बालपण, बालपणीचं शिक्षण अत्यंत मजेशीरच गेलं. अगोदरच सांगितल्याप्रमाणं.

सर्वांनी भरभरून माझ्यावर प्रेम केलं. त्यामुळेच असेल, मी मात्र सामान्य होवून जगतोय. मी काही एवढा हुशारही नाही. सर नेहमी म्हणतात, तू प्रगती करावीस. सारं काही लक्षात येतं. दरवर्शी माझा पहिला नंबर ठरलेलाच. शाळेत मी सर्वांशी मिळुन राहतो. एकदा आम्हाला सरांनी मेलजोल प्रशिक्षणा निमित्य माहिती लिहायला सांगीतली. सारं काही खरं खरं लिहायचं होतं. नाव, पत्ता, अत्यंत जवळचे मित्र असं सारं काही.

मला छंद चित्रकलेचा, चित्र काढणं मला फार आवडतं. थोडंफार चांगलं चित्र काढता येतं. सर्वाशी प्रेमानं चांगलं वागणं हा माझा जीवन उद्देश, असही मी त्यात लिहलं. मला मात्र डॉक्टर व्हायचं आहे असच वाटतं.

सरांनी म्हटलं “डॉक्टर व्हायचं ना! मग इंग्रजी, विज्ञान अगदी सुरेख जमायला पाहिजेत.”

त्याप्रमाणे मी प्रयत्न करतोय.

सर कधी रागावतातही, पण सर मला कधी मारीत नाहीत. का बरं असेल? मला अजूनही समजलं नाही. पण एकदा सरांनी मला दहा छडया मारल्यात. हातावर वळ आलेत मला काही एक वाटलं नाही. की माझी तक्रारही नाही.

'आपल्याला आई—वडील नाही का मारीत?'

'का बरं मारावं?'

'आपण कुठतरी चुकतो म्हणूनच ना!'

'आम्हाला कुठं समजतं? सरांनी मारलं तर बिघडलं कुठं? आपल्या भल्यासाठीच सांगत असतात ना!'

सरांनी कधी एखाद्या मुलास मारलं तर काही मुलं शिव्याही देतात. मला सारं काही कळतं. इतका राग येतो की नाही? वाटतं त्या मुलांचा गळा दाबून टाकावं.

आईला म्हटलं, 'आई गं, सरांनी त्या संदिपला मारलं तेव्हा तो शिव्या देवू लागला. मला खुपच राग आला. दुसऱ्या सरांनी कुणाला बोलले, कुणाला मारले किंवा इतर सरांना कुणी शिव्या दिल्या तरी मला एवढं काही वाटणार नाही. पण आमच्या सरांना कुणी शिव्या दिल्या ..........'

'एखाद्या दिवशी ................'

"अनिकेत एवढं राग येवू देवू नये, सरांनी मुलांना मारणं, मुलांनी सरांना शिव्या देणं, त्यात एवढं विशेष काय आहे?
हं! मला किंवा सरांना कुणी शिव्या दिल्या तर तू कुणाला मारू नकोस. जर का मी एखाद्या मुलास मारलं तर मला मुलं शिव्या देत नसतिल का? याचा विचार केला का कधी?"

आईचं म्हणणं अगदी बरोबर होतं. तेव्हापासुन मुलांच्या बोलण्याकडे दुर्लक्ष करायचा. राग लोभ तर चालायचंच.

'सरांनी कवितेत लिहलंय

उंच भरारी चंद्रावर घ्या
आकांशा फुलवतील दिव्य
पुज्य असावे सानेगुरूजी
व्हा तुमचे तुम्ही एकलव्य!'

मला कळतय आपणास उंच भरारी घ्यायची आहे. आपला गुरू कुणिही असेल त्यांच्यावर श्रद्‌धा असावी, गुरू पुज्य असावा. स्वतःच एकलव्य बनायचं. माझं स्वप्न कधी तरी पुर्ण व्हावं........
'एकलव्याचं!'

00

मी पहिल्या वर्गात असतांना माझी आईच मला शिकवायची. मला आठवतं, मी वर्गात खूप मस्ती करायचा. मला इतरासारखी भीती वाटत नव्हती. पण मी खूप खोड्या करतो. म्हणून मुलं आईला सांगायची. आई माझ्यावर रागवायची, मारायची सुद्‌धा, मी हिरमुसून जायचा. नंतर आई वर्गात नसली की जशास तसं वागायचा. माझ्यामुळं आई त्रासायची, आई मला घरी समजावून सांगायची.

"वर्गात मस्ती करू नये, सर्वांशी भांवडागत मिळून मिसळून राहायचं, मी तुझी घरी आई आहे. वर्गात मला मॅडमच म्हणायचं. विसरू नकोस हं!" असं नेहमीचं सांगणं.

बालपणीच्या आठवणी किती मस्त असतात नाही का? आपण कितपत चुकलो याचा विचार भविश्यातच करतो. चुकतांना चूक कळत नाही. चूक कळली तरी आपण त्या चुकापासून वळत नाही. सर्वाच्या बाबतीत नेमकं असच घडतं.

मी दररोज शाळेत जायचा. मला चांगल्या प्रकारे लिहिता वाचता येत होतं. तेव्हा आठवी ते दहावीचे वर्ग आमच्याच शाळेत भरायचे. मुख्याध्यापक मा. भुजाडे सर होते. त्यांना मी खूप आवडायचा. ते नेहमी माझं लाड करायचें. मी कुठेही असलो तरी ते मला बोलावून काहितरी विचारायचे. आणि नेहमी चॉकलेट घेवून दयायचे. त्यांनी मला खूप लाडावलं. नेहमी चॉकलेट घेवून दिलेत. मी सरांकडे जायचा, त्यांना नेहमी चॉकलेट घेऊन मागायचा. आईला माझं वागणं बरं वाटलं नाही. आईनी मला तर एके दिवशी चक्क बदडवूनच काढलं.

मी रडत रडत एका कोपऱ्यात दडलो. मला तरी कुठं समजायचं. मी एवढासा चिमुकला जीव, आता मला चांगली समज आली.

आई म्हणते, ‘तू असं करायचा, तसं वागायचा.’

किती हसू येतं आपलं बालपणीचं वागणं ऐकूण, मी विचार करतो त्याबाबत. तसं पाहता शाळेतली सर्व शिक्षकवृंद माझं लाड करायची. आता बऱ्याच सरांच्या बदल्या झाल्यात. मी सहावीत असतांना बऱ्याच वर्षानंतर चंद्रपूरच्या बसस्टॉपवर भुजाडे सर मिळाले. त्यांनी मला गोलू म्हणून मला आवाज दिलां. मला वाटलं इथं मला गोलू म्हणून कोण बोलावणार? मागे वळून बघताच सर दिसले. त्यांनी मला जवळ घेतलं.

‘किती मोठा झालास रे गोलू!’

मी सरांना पाहताच भारावून गेलो. सरांना काय वाटलं ते मला कसं काय कळणार? पण त्यांनी माझी पप्पी घेतली.

“चल आता तुला चॉकलेट घेऊन देतो, तुला चॉकलेट फार आवडते ना!”

सर हसायला लागले, मी लाजलो आणी म्हटले,

“मी आता चॉकलेट खात नाही.”

“बरोबर आहे, मोठा झालास ना आता! कसं खाणार बाबा चॉकलेट.”

मला सरांनी चॉकलेट घेवून दिलं. मी नको म्हणतच राहिलो. मला चॉकलेट घ्यावच लागलं. मी भारावलो, जाणाऱ्या एस.टी. कडे पाहातच राहीलो. विचार करतोय अजूनही भुजाडे सर कधी तरी भेटतील. मला कवटाळून घेतील. मोठं झाल्यावरही मला चॉकलेट घेऊन देतील. त्यांच्या प्रेमाने मी मोहीत होणार, अगदी पावसाच्या तुशारागत...मी त्यांना चरणवंदन करणार. पण काय माहित? कधी भेट होणार सरांची.....

00

उन्हाळयातील परीक्षा संपल्या. परीक्षा आली की नुसता वैताग वाटतो. मलाही कंटाळा यायचा. सारखे आई—बाबा अभ्यास कर. म्हणून ओरडायचे. मन नसतांना अभ्यास करणं जीवावर यायचं. तसं पाहता मी खूप अभ्यास करायचा. पण एखाद्या वेळेस खेळावं वाटलं तरी त्यालाही नकार. मी कंटाळायचा वाटायचं
घर सोडुन कुठं तरी जावं. मी लहान होतो ना! म्हणून कदाचित कशाचाही विचार न करता माझ्या मनात असले विचार यायचे.

परीक्षा संपली की मजाच मजा खूप खेळायला फिरायला मिळते. मामाच्या गावला जायला मिळते. आणि अभ्यासाला सुट्टी, आता सांगा! कुणाला बरं उन्हाळा आनंदाचा वाटणार नाही. उन्हाळयातील ऊन दररोज तापायची. तरीपण उन्हात खेळणं आम्हा मुलांना काही मोठी गोष्ट नाही.

एकदा उन्हात खेळतांना दादाचं नी माझं भांडण झालं. अशी मस्ती करतानांच मला खूप जोरात लागलं. मी जोराने मोठया आवाजात रडू लागलो. मला राहवेना, इतक्यात आई आली. माझं रडणं ऐकूण आई त्रासली. माझं रडणं काही थांबेना. पाहता—पाहता आई काठीने

बदडायला लागली. मला आईचा खूप राग आला. मी तिथून रडतच उठलो. आईला म्हणलो,

“आता या घरात मी राहणारच नाही.”

तेव्हाच सायकल घेऊन बसस्टॉपकडे रडतच जायला निघालो. मला आई बाबानी कुणीच अडवलं नाही. पण दादा, माझ्या मागे मला पाहायला आला. त्याने घरी चलण्यासाठी मला ओढत नेलं.

पण मी आता कुठं जाणार होतो? मी रडतच आपल्या अटीवर कायम राहिलो. दादा माझं नकार ऐकून त्रासला, निघून गेला. मी बऱ्याच वेळपर्यंत तिथं रडत होतो. सांयकाळी घरी हिरमुसून परतलो. आई बाबानं माझ्याकडे बघीतलं. पण मला काहिही म्हटलं नाही.

माझा राग पाहून हसले, मलाही हसू आलं. खूप जोराची भूक लागली होती ना!

00

मला सरासोबत विज्ञान प्रदर्षनामध्ये सहभागी व्हायला जायचं होतं. प्रदर्शनाला जाण्याकरीता माझी निवड झाली. मला आनंद झाला. गांडूळ खत बायोगॅस प्रकल्प मी सरांच्या मार्गदर्शनात तयारही केलं. सरांच्या घरी मला प्रकल्प बनवण्यास सरांनी मदत केली. दुसऱ्या दिवशी नारंडा येथे मी प्रयोग मांडला. मी तयार केलेलं प्रयोग तसं फार आकर्षक होतं असं मला वाटलही नाही. पण विद्यार्थ्यांना समजण्यास फार सोपा होता.

प्रदर्शनीत इतर शाळेतील विद्यार्थी प्रयोग बघण्यास येत होती. काही प्रश्न विचारायची, माहिती विचारायची, काही मला माहितच आहे म्हणून खोडया करायची. इतर शाळेतील सर, मॅडमही प्रयोग बघण्यास येत

होती. प्रदर्षनीत जवळपास शंभराच्या वर प्रयोग आले. मला सरांनी मार्गदर्शन केल्याप्रमाणे मी सर्वांना माहीती द्यायचा. प्रदर्शनीचे तीन दिवस मजेत गेले. मी सरासोबत दररोज येणे–जाणे करायचो. शेवटच्या दिवशी सरांनी बक्षीस वितरण समारंभाला मला नेलं नाही. त्याला कारणही तसच होतं.

आमचा प्रयोग उत्कृष्ठ असेल, बक्षिस मिळवेल असं वाटतच नव्हतं. प्रदर्शनीच्या गावी जायला चार–पाच कि.मी. पायदळ चालावं लागायचं. मी लहान असल्यामुळे होणारा त्रास पाहुन सरांनी मला न्यायचं टाळलं. मलाही पाय दुखत असल्यामुळे फार बरं वाटलं.

त्या दिवशी मी गावला निघून आलो. प्रयोग परत आणण्यास सर नारंडा येथे गेले. प्रदर्शनीत ताटकळत उभं राहावं लागायचं. केव्हा केव्हा मी त्रासायचो. परंतु सरांना मी बोलू शकत नव्हतो. परीक्षण करणारी सरलोक आली तेव्हा सरांनी सांगीतल्याप्रमाणे फार सुदंर शब्दात माहिती दिली. मला तशी भीतीही वाटायची. कारण सरांनी म्हटलं होतं आपण जेवढी चांगली माहीती देवू त्यावरच आपला नंबर अवलंबून असेल. तसं पाहता दिवसभर सर्वांना प्रयोगाविषयी माहिती स्पष्ट करून सारं काही तोंडपाठ झाल्यासारखच वाटायचं. परीक्षकांना मी जमेल त्याप्रमाणे स्मितहास्य करून माहिती दिली.

शेती आणी शेतीचा विकास, आर्थिक परिस्थिती बेताची असतांना आपण कसे करायचे, बायोगॅस प्रकल्पामुळे आपणास इंधन मिळते. वर्षाकाठी आपल्याला किती फायदा होतो. पर्यावरणाची बचत तसेच
शेती करीता त्यापासून ऑस्ट्रेलियन गांडूळा द्वारा शेणखत कसं तयार करायचं याची सोपी माहिती मी सर्वांना द्यायचा.

प्रदर्षनीत माझा तृतिय क्रमांक आला. प्रमाणपत्र, शिल्ड मिळालं अशी माहिती मला मिळाली. कारण सर शाळेच्या गावी राहात नसल्यामुळे सर दुसऱ्याच दिवशी येणार होते.

बक्षीस मिळालं असं ऐकताच कधी नव्हे तो इतका जाम खुश झालो. माझ्या आनंदाला पारावरच उरला नाही. आई, बाबांना आनंदाने उड्या मारतच सांगितलं. थोडासा हिरमुसलो, जर का मी बक्षीस वितरणाला गेलो असतो तर!

रात्रभर विचाराने थैमान मांडलं होतं. सरांना आत्ताच जाऊन भेटावं, आपल्याला मिळालेलं बक्षिस पहावं, आनंदाश्रू माझे गळायला लागले.

वडाच्या झाडाजवळ मी सरांची वाट पाहात बसलो. सर येताच मी त्यांच्याकडे धावतच गेलो. सर खिन्न, उदास भासले. सरांनी मला शिल्ड व प्रमाणपत्र दिलं. मी माझ्या अप्रत्यक्ष झालेल्या गौरवाकडे पाझरल्या डोळयांनी बघतच राहीलो. मुलं माझ्याभोवती गोळा झाली. मला काही सुचेना फक्त बक्षीस आणी मी, हे स्वप्न तर नव्हतं!

“अनिकेतला बक्षीस वितरणाला नेलं असतं तर, माझ्या समोर त्याचा गौरव होतांना बघितला असता. स्वतःचं बक्षिस घेतांना त्यालाही आनंद झाला असता. त्याचं हक्क मी हिरावलं. मला खूप वाईट वाटतंय. मला तरी कुठं माहित होतं.”

आईला सरांनी म्हटलं होतं.

मला तरी कुठं समजत होतं या मनातील भावनांचा अर्थ!

जीवन जगतांना अनेक चांगल्या वाईट गोष्टीशी सामना करावं लागतं. अनेकावर विश्वास ठेवावा लागतो. प्रत्येक व्यक्तीच्या मनपटलातील केंद्रबिंदूला छेदत मार्गभ्रमण करावं लागतं.

मलाही अगदी असच करायचं होतं. माझ्यासमोर एकच मार्ग, एकच ध्येय....

वर्तमाणपत्रात बातमी आली. माझं नाव पेपरला बघून मी भान हरपलो. खूप सुखावलो, असाच सुखावणार. फक्त माया देणारी, छाया देणारी कुणी ना कुणी व्यक्ती जर जवळ असेल तर ना!

वर्गात पहिल्यांदाच निवडणूक घ्यायची ठरली. आजतागायत अशी गुप्त मतदान पद्धती कधीही शाळेत झाली नव्हती. कुण्यातरी योग्य नेतृत्व करणाऱ्या मुलांना तोंडी पद्धतीद्वारा वर्गनायक ठरवायचे. मी दरवर्शीच वर्गनायक असायचा. मला ते योग्य वाटत नव्हतं.

दरवर्षी मीच का बरं वर्गनायक? इतर विघार्थ्यांचा हक्क का बरं डावलल्या जातो? असे प्रश्नविचार वारंवार यायचे. सहावीत असतांना मी सरांशी असं बोललोही, त्यामुळे मी वर्गनायक तर नव्हतोच, माझा अखेरपर्यंत नकार राहिला.

सरांनी नवीन उपक्रमागत मेलजोल अफलातून क्लबची स्थापना करावयाचे ठरविले. अध्यक्ष, उपाध्यक्ष, सचिव या पदासाठी निवडणूक होणार होती.

सरांनी मतपत्रिका तयार केल्या. प्रत्येकी एक पत्रिका मिळणार होती. त्यामध्ये उभ्या असलेल्या विद्यार्थ्यांवर आपल्या आवडीनुसार गुप्त मतदान पद्धतीने मतदान करायचे होते.

आमच्या वर्गात बावन विद्यार्थ्यांमधून पंधरा उमेदवार निवडणूकीस उभे राहिले. सुरवातीला मी उमेदवारी अर्ज भरला नव्हता. अखेरच्या क्षणी मी उमेदवारी अर्ज भरूण उमेदवारी निश्चित केली. तसं पाहता सर्वांना मी उभा नसल्याचे आश्चर्य वाटायला लागले. मला निवडणूक लढण्याची इच्छाही नव्हती. पण मित्रआग्रहाखातर उभा राहीलो.

प्रचाराला एक दिवसाचा अवधी मिळाला. प्रत्येक मुलं आपण निवडून यावं म्हणून जमेल तेवढा प्रचार करीत होती.

वर्गनायक आकाशही रिंगणात राहिला. मलाही आकाशच निवडून येणार असच वाटायचं. मी स्वतःचा अजिबात प्रचार केला नाही. त्याला कारणही तसच होतं. मॅडमचा मुलगा असल्याने मला जास्तच भाव मिळतो अशी बरीचशी मुलं पालक म्हणतात. त्याकरीता आई मला बऱ्याचशा बाबीपासून अलिप्त ठेवायची. मलाही आईचं म्हणणं पटायचं आपल्यामुळे आईला कुणी दुखावू नये असच मला वाटायचं.

निवडणूकीचा दिवस उजाडला. प्रत्येक विद्यार्थ्यांना क्रमवार मतपत्रिका दिल्या. आपल्याला योग्य वाटेल त्या तीन उमेदवारांना फुली मारायची होती. अगदी शांततेत मतदान पार पडलं. सर्वांच्या मनात उत्सुकता वाढली. काही उमेदवार आपण कसे निवडुन येणार हे सांगत फिरायची. मला यातलं काहीही आश्चर्य वाटलं नाही. मी कोणताही प्रचार केला नव्हता. तसेच वर्गनायक आकाश समोर आपण निवडून येणार असं वाटतही नव्हतं.

एका मतपत्रिकेवर तिन शिक्के मारायचे होते. ज्या उमेदवारास जास्त मतदान पडेल ते क्रमवार अध्यक्ष, उपाध्यक्ष, सचिव होणार होते. मी माझं स्वतःला एक मत दिलं. उरलेली दोन मत आकाश, समताला दिली. कारण ते विद्यार्थी निवडून येणार असं मनातल्या मनात वाटत होतं.

मतमोजणीस त्याच दिवशी दुपारला सुरू झाली. घडी करून टाकलेल्या मतपत्रिका उघडण्यात आल्या. एकही मतपत्रीका अवैध्य ठरली नाही. एवढं एक विशेष होतं.

सुरवातीला लीना, सुशमा, नितिन आघाडीवर होती. मात्र मी बराच मागे राहिलो. आकाश व समताला माझ्यापेक्षाही कमी मत दिसत होती. आम्हा सर्व विद्यार्थ्यांना आश्चर्य वाटायला लागलं. आम्ही केलेलं तर्क विपरीत घडत होतं.

असच असतं, कुणाच्या मनात काय असेल ते आपल्याला मात्र ठरवता येत नाही. घडलही तसच होतं. शेवटच्या मतमोजणी अखेर विजयी उमेदवाराची नावे जाहिर झाली.

अध्यक्ष मी स्वतः, मते सत्तावीस. तर उपाध्यक्ष लिना, मते एक्केवीस. सचिव नितिन, मते अठरा मिळवून उमेदवार विजयी ठरले होते.

माझ्या आनंदाला पारावारच उरला नाही. पण मी अध्यक्ष कसा झालो, याचच आश्चर्य वाटायला लागलं होतं. त्यापेक्षाही नितीन, लिना निवडून येईल असं कुणासही वाटणार नव्हतं. पण प्रत्यक्षात वेगळच घडलं होतं.

मी निवडून आल्याबद्दल सर्वांना चॉकलेट दिली. काही क्षणभर नाराज तर काही सुखावतच होती. मीही सुखावलो होतो. अगदी रसाळ फळागत ........

00

"संधीचं सोनं झालं." मला बालसभा उपक्रमाद्वाराही शाळेतील बालसभा प्रमुख म्हणून अप्रत्यक्ष सरांकडून निवडण्यात आलं. तसं पाहता शाळामंत्री करीता माझी निवड होणार असं माहित पडलं होतं. पण कुणास माहित?

तसं पाहता माझी निवड मला योग्य वाटली. आमच्या शाळेत बालसभा उपक्रम आठवडयातून एकदा घेतलं जायचं. त्याकरिता एक दिवस दोन तासाचा अवधी राखूनही ठेवला होता. त्यामध्ये निरनिराळया स्पर्धा पार पाडल्या जायच्या. मुख्यतः आम्हा विद्यार्थ्यांना प्रश्नमंजूशा स्पर्धा फारच भावली.

दर आठवडयाला वर्ग एक ते सात मधून फक्त सामान्य ज्ञानाची प्रष्न विचारून, ज्या विद्यार्थ्यांस जास्त प्रश्नांची उत्तरे देता येईल, अशा

एकाच विद्यार्थ्यांची प्रत्येक वर्गातून निवड केली जायची. त्यामध्ये आठ विद्यार्थ्यांची निवड चाचणी घेवून दोन–दोनचे चार गट पाडले जायचे.

ठरलेलया दिवशी त्या चारही गटांना सिटवर बसवलं जायचं. आम्ही सर्व विद्यार्थी त्यांच्यासमोर 'कौण बनेगा करोडपती' या टी.व्ही. मालिकेवरील आधारीत खेळाप्रमाणं समोर बसायची.

प्रत्येक गटास चार फेरीमधून अभ्यासक्रमावर आधारीत प्रश्न विचारली जायची. त्यांना पर्याय दिले जायचे. या स्पर्धेचे संयोजक संजय येरणे सर होते. त्यानींच ही स्पर्धा सुरू केली होती. दर आठवडयाला त्या चार गटामधून एक गट विजयी व्हायचा. ज्या गटास जास्त गुण मिळाले तो गट विजयी.

आम्हाला खूप ज्ञानात्मक माहिती मिळायची. सामान्य ज्ञानातही त्यामुळे भर पडायची.

शेवटी दोन महिण्यांनी सर्व विजयी गटाची अंतिम निवड चाचणी कठीण पातळीनुसार व्हायची. त्यामध्ये आजतागत सर्व क्रमानुसार विजयी गटांना शाळेतर्फे उपयोगी भेटवस्तू देवून गौरव केला जायचा.

आम्हाला स्वतःचा नंबर तिथं लागावं असं वाटायचं त्याकरिता प्रत्येक विद्यार्थी अभ्यास करायचे. परंतु एकाच विद्यार्थ्यांची निवड केली जायची. कोणते प्रश्न स्पर्धेत विचारणार हया बद्दल कुण्याही सरांना माहिती नसायची. अत्यंत योग्य पद्धतीने ही स्पर्धा हाताळली जायची.

यातली मजेशीर बाब म्हणजे एखाद्या गटास प्रश्नाचे उत्तर न आल्यास शिक्षक किंवा विद्यार्थीमित्र अशी लाईफ लाईन उत्तर देण्याकरीता निवडण्याची मुभा असायची. प्रत्येक प्रश्नांची उत्तरे द्यायला तीस सेकंदाचाच अवधी असायचा. त्यामुळे की काय? मजेशिर स्पर्धा म्हणून आम्हाला ती भावली.

त्यातही विशेष असं की, त्या स्पर्धेचं संचालन, अध्यक्षपद तथा प्रमुख पाहुण्यांचे पद विद्यार्थ्यांनाच मिळायचे. बरेचसे विद्यार्थी उत्तम प्रकारे

प्रास्ताविक, संचलन करायचे. भाषणं द्यायची. आमचे शिक्षकवृंद आम्हाला मार्गदर्शन करायची.

विद्यार्थ्यांनीच विद्यार्थ्यासाठी चालवलेली स्पर्धा, विद्यार्थ्यांना मिळालेला मान होता. सर फक्त मार्गदर्षक असायचे.

मी बरेचदा कार्यक्रमाचं संचलन केलं. आवडीने मी त्यात सहभागी व्हायचा. यामुळेच बोलण्याचं कौशल्य, स्टेज डेअरींग मला मिळाली. एकदा या स्पर्धेचं अध्यक्षपदही भुशवायला मिळालं. मी माझ्या अध्यक्षीय भाषनाची तयारीही केली, पण मला खूप ताप आल्यानं शाळेत उपस्थित राहू शकलो नाही. त्यानंतर गेलेली संधी मला परत मिळाली नाही.

थोर नेते मौलिक विचार स्पर्धा, वादविवाद स्पर्धा, एकमिनीट स्पर्धा अशा बऱ्याचशा स्पर्धांचं आठवडयातून एकदा आयोजन आम्ही करायचो. सरांचं फक्त मार्गदर्शन असायचं. आमच्या बालसभाद्वारा शाळेचं विद्यार्थी मंत्रीमंडळ आपसात कामे वाटून जय्यत तयारी करायचे. अंतिम फेरीला फार मोठा कार्यक्रम घेवून ग्राम शिक्षण समीती सदस्यगण तथा बाहेरगावचे पाहुणे मंडळींना आंमत्रीत केलं जायचं. याबद्दल वर्तमाणपत्रातही स्तुत्य उपक्रमाबाबत वार्ता देण्यात यायची. त्यात माझं नावही प्रकाशित अनेकदा व्हायचं. तेव्हा मी भान हरपून आनंदाने उडयाच मारल्या.

मेलजोल अध्यक्षपदावर निवडून येताच भोयगाव येथील आयोजित शिबीर स्थळी शाळेचं नेतृत्व करण्याचा योग मला मिळाला. त्यावेळेस आमच्या सोबत बोबडे सर तिथं आले. मुबंईहुन दोन मॅडम आल्यात. त्यांनी आम्हाला नेतृत्व, कला तथा इतर विषयासंबधी भरपूर माहिती दिली. मला तीथं तीन दिवस रहायला मिळालं.

गाणे, खेळ, गोष्टी यामुळे मला भरपूर अनुभव मिळालं. तसच भरपूर मनोरंजनही झालं. तिथं आम्हाला दररोज जेवन मिळायचं. पण आम्हाला चहा मिळत नव्हता. तसं मला चहा आवडत नाही. पण सकाळी एकदा

आवडीने चहा घ्यायचा. आमच्या प्रत्येक गटाला पुस्तके व बुके देण्यात आली. तिथं शिबीर स्थळी केलेल्या कार्याचा अहवाल दररोज सांयकाळी द्यावा लागायचा. तीन दिवस शाळेचं नेतृत्व करण्याचं भाग्य मला लाभलं. त्या शाळेविषयी आदर प्रेम कुणाला नसणार बरे!

00

सांस्कृतिक आणी क्रिडा संमेलनात बरेचशे विद्यार्थी सहभाग घ्यायचे. मला अभिनय येत नसल्याने मी सांस्कृतिक कार्यक्रमात सहभागी होत नव्हतो. त्याबाबत मला अनुभवही नव्हता.

'आवड असली की सवड मिळते.' असचं माझ्या बाबतीत घडलं आपल्याला अभिनय करता यावं नेहमीच वाटायचं. तसे मी प्रयत्न सुरू केले. समुहगीत, फॅन्सीड्रेस, एकांकिका यामध्ये हळूहळू सहभागी होवू लागलो. पण मला नाचता येत नव्हतं. आणि कधी नाचताही आलं नाही. सिंदेवाहीच्या, गाडेगावच्या कार्यक्रमात नाना पाटेकरची भूमिका छान जमली. माझ्याकरिता तो क्षण अविस्मरणीय ठरला. मला माझ्यावरच विश्वास बसेना.

शाळेत प्रजासत्ताक दिनी सांस्कृतिक कार्यक्रमाकरीता 'श्यामची आई' सानेगुरूजींच्या कांदबरीवर आधारीत रूपांतरीत एक अंकी नाटक घ्यायचं ठरलं. ज्या विद्यार्थ्यांना सुरेख पात्र जमेल त्या विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली. मला श्यामच्या वडिलांची भूमिका मिळाली. आमचा दररोज सरावही सुरू झाला. पण ते नाटक सादर होवू शकलं नाही. मनाला खंत वाटली. अभिनयाचं भरपूर वाव असलेलं पात्र, माझ्या भूमिकेचं पहिलच नाटक न झाल्याने मी निराश झालो.

यश अपयश जीवनात यायचेच. मला तर यश मिळत होतं. मात्र हे अपयश नव्हतं. एक अनुभव बनुन माझ्यासमोर आलं.

खो–खो, कबड्डी क्रिडास्पर्धात माझा सहभाग असायचा. खो–खो खेळ मला बरं खेळता यायचा. कबड्डीत मात्र विशेष  मन लागत नव्हतं.

गाडेगावच्या क्रिडास्पर्धेत कबड्डीमध्ये मी राखीव खेळाडू होतो. त्यात मला अचानक मैदानात उतरावं लागलं. आमच्या समोर खूप उंचीने, वयाने मोठे मुलं होते. त्यामानानं मी असा बारीक, हडकुळा, कमजोर देहाचा, मला काय कबड्डी येणार होती? मी मैदानात एकदाही चढाई केली नाही. त्या स्पर्धेत आम्हाला व्दितिय बक्षिस मिळाले.

त्यातला माझा सहभाग नाममात्र व योगदान बघता ते शुन्यच भरेल. सारं काही यश माझ्या मित्रानींच मिळवलं होतं. एवढं नक्की...........

00

यावर्षी शाळेत ‘अंतरंग’ नावाचं वार्षिक आंक हस्तलिखीत प्रकाशित करण्याचा संकल्प करण्यात आला. तसं पाहता प्राथमिक शाळेत तिनशे पृष्ठाचं हस्तलिखीत प्रकाशित होणं ही नवलाईची बाब होती. मला तरी त्यातलं कुठं काय कळत होतं? सारं काही अनुभवाने कळायला लागलं.

माझ्या शाळेतिल सरांनी खूप मेहनत घेवून ‘अंतरंग’ तयार केलं. ‘अंतरंगात’  विद्यार्थ्यांनी स्वतःचे चित्र तथा स्वतः लिहलेले व संकलित केलेले लेख, कथा कविता, चुटकुले, निबंध, विचार इत्यादी बाबी लिहल्यात. सरांचे मार्गदर्शन, लेख, कथा, कविता हया बाबी आम्हाला वाचण्यास उत्कृष्ट ठरल्या.

मुखपृष्टाची सुबक रंगीत कॉम्पुटर प्रिटिंग करण्यात आली. वर्गवार वर्गनायक यादी, शालेय मंत्रीमंडळ, शिक्षकवृदांचे फोटो, ग्राम शिक्षण समिती यादी, शाळेतिल यशाचा लेखाजोखा, उपक्रम यादी इत्यादी सर्व बाबीचा समावेष करून ‘अंतरंगास’ आकर्षित बनविण्यात आलं. त्या अंतरंगामुळं माझं अंतरंग उलगडण्याचा मला हक्क मिळाला. असं

विद्यार्थी या नात्याने मला वाटते. इतर विद्यार्थ्यांच्या बाबतीतही तसच घडो....

आमच्या आठवणी आम्ही खुप मोठे झाल्यावरही अंतरंगातील पानापानावर येणाऱ्या सर्वांकरीता उजाळा देत राहतील.

आजही 'अंतरंग' दरवर्षी प्रकाशित होतो. नव्या उपक्रमाची त्यात भर पडत आहे. अंतरंगाच्या व्दितीय आवृत्तीत आदर्शाकडे वाटचाल करणाऱ्या शालेय विद्यार्थ्यांचा गौरव उपक्रम सुरू केला.

शाळेतील एक विद्यार्थी एक विद्यार्थीनीची निवड करून त्यांचे फोटो तथा त्यांचे कार्य व गौरव प्राप्त माहिती त्यात नमुद करण्यात आली.

प्रथमतःच सातवीची विद्यार्थीनी कु. चंद्रकला धुर्वे व सहावीतुन माझी निवड करण्यात आली. पहिल्यांदाच आदर्शाकडे वाटचाल या गौरवाचा मी मानकरी ठरलो. माझे कार्य, गुण व स्वभावामुळे ही निवड केल्याचे कळले. मला भीती वाटते आहे माझ्या पुढिल जीवनाची.

कारण माझं पुढील जीवन आदर्शाप्रत राहावं. नाहीतर त्या गौरवाचा काय फायदा? माझं आदर्श अबाधित रहावं असच मनोमन वाटतं.

00

तालुकास्तरावर विज्ञान प्रदर्शनीमध्ये तृतीय क्रमांक मिळालं. त्यानंतर आम्हाला जिल्हास्तरावर जायचं होतं. जिल्हास्तरीय विज्ञानप्रदर्षनी सर्वोदय विद्यालय सिंदेवाही येथे ठरली. माझ्या सोबत मार्गदर्षक येरणे सर येणार होते. मी पूर्वीसारखच पण त्यापेक्षाही आकर्षक असं मॉडेल बनविलं.

मला आनंद झाला कारण मला सिंदेवाहीला जायला मिळेल एवढच नव्हतं. तर त्यांच्यासोबत सरांच्या सोबत त्यांच्या स्वगावी जायला मिळेल.

यामुळेच मी आनंदित होतो. मी लहान असल्यामुळे मला आई—बाबाशिवाय कधीही कुठल्या गावला जायला मिळत नव्हतं

नवं गाव, नवे विद्यार्थी मित्र, तिथली शाळा पाहण्याचा योग मला आला. आम्हा खेडयातील मुलातला व शहरातील चंट मुलातला फरक मला अनुभवण्याचा तो योग होता.

तिथे विज्ञान विषयक सामान्य ज्ञान स्पर्धा घेण्यात आली. तिथं मला सरांनी भाग घ्यायला लावलं. परंतु मी सहभाग घेतला नाही. मला भीती वाटत होती. स्पर्धा झाल्यानंतर असं वाटायला लागलं की, त्यातील बरीचशी उत्तर मला येत होती. सरांनी मला सामान्य ज्ञानाची माहिती दिली. आमच्या शाळेतही पुढे अशी स्पर्धा घेण्यात आली.

दिवसभर प्रयोगासमोर बसून प्रयोगविषयक माहिती दयायचं एवढच काम होतं. दिवसभर नवे विद्यार्थी, नवे शिक्षक यांच्याशी बोलायला मिळत होतं. सरांना वेळोवेळी मनात आलेल्या सर्व शंका विचारायचा. नी उत्तरे मिळवून घेत असे.

रात्रो सांस्कृतिक कार्यक्रमात नाना पाटेकर, असरानी, अमजदखॉन, हयांची मी नक्कल सादर केली. तीन चार हजार प्रेक्षकांसमोर स्टेजवर जाण्याची माझी पहिली वेळ, मला थोडी भीतीही वााटली. प्रेक्षकांना बघून मी नकारही दिला.

“तू गाडेगावला जसं कार्यक्रम सादर केलस ना! अगदी तसच करायचं. चुकलं तर चुकलं, मनात भिती बाळगायची नाही. लोकांना थोडच माहित असतं, स्टेजवर आपण काय बोलणार आहोत. कुठं अडखळलं, कुठं चुकलं हे प्रेक्षकांना काय माहित. जा बिनधास्त नक्कल सादर कर, खूप छान होईल, माझा विश्वास आहे तुझ्यावर.”

सरांच्या आपुलकीने मी स्टेजवर चढलो आणि सर्व प्रेक्षकांनी मला दाद दिली. तोच कार्यक्रम ‘वन्स मोअर’ म्हणून दुसऱ्यांदा करायला लावलं. मी सादर केलेली नक्कल खूप छान जमली होती.

नंतरचे दोन दिवस तिथले सर्व विद्यार्थी हाच व्हे नाना..... असं म्हणायची. मी लाजायचा, बऱ्याचशा सरांनी मला जवळ बोलावून तू कुठल्या शाळेचा? तुझे सर कुठे आहेत. असं वारंवार विचारायची.

मी मनातल्या मनात जाम खुष होतो.

तीन दिवसानंतर सरांच्या गावी गेलो. सरांच्या कुटुंबात मिसळायला मिळालं. नंतर आम्ही स्वगावी परतलो. प्रदर्शनीत मला कुठलाही नंबर मिळाला नाही. पण सांस्कृतिक कार्यक्रमात मिळालेल्या यशाचा वाटेकरी बनून मी परतलो.

आईला सारं काही सांगीतलं. मित्रानांही खूप माहिती दिली.

नव ज्ञान – नव दिशा मला मिळतच राहो.

‘हम होंगे कामयाब एक दिन ..........मन मे है विश्वास ...’

गितांच्या ओळी मनात रेंगाळतच राहाव्यात. अगदी सरांच्या आईने बनविलेल्या वडयाची चव माझ्या जिभेवर जशी रेंगाळत आहे अगदी तशीच....

00

तिसऱ्या वर्गात असेन, आई सोबत मामाच्या गावला आठ–दहा दिवस राहायला गेलो. मामाच्या गावी खूप छान– छान मन रमतं.

‘झुक झुक झुक झुक अगीनगाडी....... धुरांच्या रेखा .... पडती झाडे......तुप रोटी खावूया ......’

खरच! मामाच्या गावी जायलाच हवं. अगदी असच हिंगणघाटला रेल्वेनी जायला मिळे. तिथं मी वेटाळातील प्रत्येक घरी जायचा. तसं मी पूर्वीपासनच खडबडया होतो. कुणाच्या घरी गेल्यानंतर कुणी काही खायला दिलं तर सुरवातीला मी नाही म्हणायचा. नंतर आग्रह करताच

मी खाऊन घेतो. तशी माझी सवयच आहे. पण माझा दादा कधिही कुणाच्या घरी काहीही खात नाही. त्याला नाही आवडत! तसं तो नेहमी माझ्यावर रागावत असतो.

‘कधी कुणी काही दिलं तर खाऊ नये?’

त्या दिवशी मी शेजाऱ्याकडे गेलो. त्यांनी मला उपमा खायला दिला पण मी खाल्लं नाही. दादाची गोष्ट मला पटकन आठवली. त्यामुळं मी नकार दिलं. तेव्हा शेजारची काकू म्हणाली.

“पहा, इतका लहान असूनसुद्धा कुणी खायला दिलं तर खात नाही. किती शहाणा असल्यासारखा वागतो.”

नंतर मी घरी आल्यावर आईला सांगीतलं.

“अनिकेत कुणी प्रेमाने आग्रह केलाच तर खायला काय हरकत आहे?” आईनं म्हटलं. तेव्हाच मी त्यांच्या घरी धावत गेलो. दादाबद्दल माहिती सांगीतली, नी मी त्यांना उपमा मागून खाऊन टाकला.

आई माझ्या असं वागण्यामुळं खूप हसली. ती हसते आहे. हसतच राहावी. सदासर्वकाळ......फक्त माझ्यासाठी......

00

हिंगणघाटवरून बाखर्डीला मी मावशी आई परत यायला निघालो. राजुऱ्यात बसस्टॉपवर बसची वाट पहात होतो. तेवढयात एक बस आली. आई कुठली बस आहे ते बघायला गेली. मीही आईच्या मागे पळतच गेलो. गर्दीमुळे आई दिसली नाही. मला वाटलं आई त्या बसमध्येच बसली असेल.

मी रडकुंडा होवून त्या बसमध्ये चढलो. आईला बघू लागलो.

‘आई, आई .......’ म्हणत रडू ओरडू लागलो. आई मला दिसलीच नाही. बस धावू लागली. मी रडू लागलो. तिथल्या लोकांना ‘माझी शारदा आई दिसली का?’ रडतच विचारलं. मी माझ्या गावाचं नाव सांगताच

त्यांनी मला बसमधून उतरवलं. मी रडतच इकडे तिकडे पाहू लागलो. मी खूप घाबरलो होतो. आई मला शोधतच होती. आई दिसताच आईकडे पळतच गेलो. आईला कवटाळलं. आईनं मला जवळ घेतलं. आधी समजावलं. नंतर खूप रागावली. मावशीही रडायला लागली होती. नंतर काही वेळ आम्ही बसस्टॉपवर बसुन राहिलो. मावशी मला समजावू लागली.

माझं रडण हळूहळू कमी होवू लागलं. गावच्या बसमध्ये चढलो. बस धावत होती. मन सैरभर हिरवी पराटी पाहू लागलं. मनात विचार येत होते. मन पळत होतं. बालपणाच्या आठवणी अशाच पळत राहणार त्यादिवसापासून कुठं जर गेलो, आणि कुणी मला जर सांगीतलं, 'इथेच थांब!' तर........काय? मी तिथून कुठेच हलत नाही.

00

एकदा आमच्याकडे जेवणाचं आमत्रंण होतं. तसं मला कुठलं आमंत्रण आलं की, जेवायला जाणं खूप आवडतं. तीथही मी रामटेके सरांकडे जेवायला गेलो. पंगती मध्ये सरांशी जेवायला बसलो. सगळे लोक लेवायला लागले. पण मी आपला चूपचाप. सरांचं माझ्याकडे लक्ष गेलं.

"अरे! अनिकेत जेवन सुरू कर." सरांनी म्हटलं.

'सरजी, मला जेवणावर तेल दिलं नाही.' मी म्हटलं.

"आता तुला तेल कसं मागायचं, इथं तेल कोण देणार, तू असच जेवण कर."

मी जेवण केलं नाही.

'मला तेल हवं, नाहीतर मी नाही जेवणार जा!'

मला तेल पाहिजेच, मी आग्रह सुरू केला. सरांनी ओळखीच्या व्यक्तीला बोलावलं. त्यांनी मला तेल मागून दिलं.

मी जेवण सुरू केलं. घरी येताच सरांनी आई–बाबाला सांगीतलं.
“तुमचा गोलू खुपच जिद्दी आहे, तेलाशिवाय हा जेवणच करीत नव्हता.” आईनं मला समजावलं, “कुठेही जेवायला गेलं तर काहीतरी पाहीजेत असं हट्ट धरू नये.”
मी वयाने, शरीराने, विचाराने मोठा झालो. ही गोष्ट आई मला सांगते. तसं मला आठवत नाही. तेव्हा मी पहिलीत असेन. आईने काढलेल्या बालपणीच्या आठवणीने हसू येतं. खूप मजा येते.
बालपणी हट्ट केला तर तो पूर्ण झालाच पाहिजे नाही का?
असं बालपण पुढेही मिळावं, मी विचार करतोय,.......
‘किर्तीरूपानं उरण्याचा.’

00

सोमेश्वर शिरपुरकर माझा बालमित्र, माझ्यापेक्षा दोन–एक वर्षाने लहान असेल. त्याच्याशी खेळण्यात रमण्यात खूप मजा येते. दोघेही मिळुन शाळेत जाणं. सरांनी सांगीतलेली कामं करणं इतपत त्याच्याशी गट्टी रमली. स्वभावानेही तसा दिलदार आहे बेटा, मागे त्याची तब्येत बिघडताच मी त्याला पाहायला गेलो. मित्र कर्तव्य ना माझ हे!

दररोज शळेत आटयापाटया खेळणे. खूप मजा लुटणं एवढच खेळण्यासंदर्भात कळलंय मला. कधी–कधी क्रिकेट खेळणं, तसं माझ्या आवडीचं खेळ. मलाच काय? कुणाला बरं आवडणार नाही. पण नको रे बाप्पा उगीच क्रिकेट.

त्या दिवशी अचानक पहिल्या वर्गाच्या चिमुकल्या मुलास खूप जोरात चेंडू लागला. तेव्हा मला खूप वाईट वाटलं. आईच्याच वर्गातील मुलगा होता तो....

“खेळ खेळायचं पण आपल्यापासनं दुसऱ्यास त्रास होवू नये”. आई म्हणायची.

शाळेचं मैदान फारसं मोठं नव्हतं. आणि एकाच मैदानात तिनशे मुलं खेळणं म्हणजे मोठे खेळ खेळायला वाव मिळत नव्हतं. कधी वाटतं शाळेला खूप खूप मोठं मैदान असतं तर.............

नेहमी सोमेश्वरला मी म्हणायचा, पण सोमेश्वर बेटा नुसता हसतो. हं! तो हसायला फारच वस्ताद आहे. त्याला सांगीतलेल्या कामाला तो कधीही नकार देत नाही. तशी सगळी मुलं माझं फारसं ऐकतात. केव्हा–केव्हा उगीच वाटतं मनाला.

एके दिवशी मला कटिंग करायला गडचांदूरला जायचं होतं आमच्या गावात सलूनचं दुकान नाही. खेडयातील न्हावी धंदा करण्याकरीता मात्र इथे येत असतात.

चांदूरला त्यालाही सोबत नेलं. तीथं बराच उशीरही झाला. जोराची भूक लागली. मी केळ विकत घेतले. दोघांनाही भरपूर केळी खाल्ली. पण झालं उलटच, सोमेश्वरला तीन चारदा संडासला जावं लागलं. मला फार वाईट वाटलं. आपल्यामुळे त्याला त्रास झाला. दोन–तीन दिवस तो पोटाची तक्रार घेवूनच होता.

बरं झाल्यावर त्याला म्हटलं ‘हं! चांदूरला केळाची कशी मजा झाली.’

तो निव्वळ हसला.......

मलाही हसू आलं. आईलाही हसू आलं. असच हसत राहावं हसतच जगावं, अगदी माझ्या बालमित्रासारखं. केव्हा त्याच्या आठवणी उमाळून

येतात. हसूही आवरत नाही. जेवण करतांना मग्न असलो तरी मी हसतो. आई बाबा विचारतात, कशाचं हसू आलं?

मी आणखी हसतो. मनातल्या मनात हुदंका घेवून 'काही नाही असच.' सारं काही आठवतं.....फक्त हसणं. बालपणाचं हसणं, या जन्मावर या जगण्यावर शतदः प्रेम करावं.

00

बालपणापासूनच मी धडपड करीत आलो. अभ्यास करणं जेवढं महत्वाचं तेवढंच खेळणही. अगदी लहान असतांना चेतनशी मी टायर चालवण्याचा खेळ खेळायचा. शांत सुस्वभावी असाच हा माझा मित्र मला लाभला. अभ्यासातही हुशार बेटा.

एकदा सरांनी आम्हाला तुम्ही काय बनन्याचा प्रयत्न करणार असा प्रश्न केला.

चेतन म्हणाला "मी इन्सपेक्टरच होणार" तेव्हा सरांनी म्हटलं, "शरीराने धडधाकट आहेस तू, तसाच हुशारही, तुझी जिद्द, तळमळ अशीच वाढवीत रहा. तू तुझं ध्येय नक्कीच गाठशील.

चेतन मला म्हणाला, "अनिकेत तुला काय व्हावसं वाटतं?" मी किंचीतसा हसलो. क्षणभर विचार केला. 'मला डॉक्टर व्हावसं वाटतं.'

मी विचार करतोय. माझे ध्येय, स्वप्न पूर्ण होणार की नाही? जर कदाचित या ध्येयापासून परावृत्त राहिलो तर.....

00

यावर्षी शाळा मंत्रीमंडळात अध्यक्ष पदावर निवड, वाचनालय समितीवर अध्यक्षपद मिळालं. छोटयाश्या वाचन विचार स्पर्धेत प्रथम

पारीतोषिक मिळालं. खूप शिकावं खूप मोठं व्हावं, मनाने, भावनेने अंगी आदर असावा. असं सारखं वाटतं. ही धडपड कायम राहावी. दरवर्षी प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण व्हावं जिद्द, तळमळ ही कायम ठिकावी. समाजाचं ऋण फेडण्याचं बळ अंगी यावं मी कृतज्ञ असेन या गुरूजनांचा, या समाजाचा, या देशाचा.....

माझे चार पाच बालमित्र मिळून आम्ही तान्हा पोळा साजरा करायचं ठरवलं. त्याकरीता प्रत्येक घरून मी वर्गणी गोळा केली. माझ्या गावात वार्डा–वार्डात पोळा भरतो. पण आमच्या वार्डात पोळा भरत नाही. तीस रूपये गोळा केले. सिताफळाच्या झाडाचं तोरण बांधलं. त्याला कारणही तसच होतं. जवळपास आंब्याची झाडं नव्हती. खूप मोठया झाडाला आमचे हातही पुरले नसते त्यामुळेच......

वर्गणीच्या पैश्यातून पोहे, साखर, चॉकलेट, फुगे घेतले. पोळा भरवायच्या ठिकाणी तोरण बांधून जागा सजवली. सर्व मुलांनी लाकडी नंदीबैल आणले. सर्वांना समोर बसवलं, साखर पोहयाचा काला तयार केला. बैलाची पूजा केली. आरती केली. त्यानंतर बैलाच्या सभोवताल मी गुढी फिरवली. एक दोन दणक्यात नारळ फोडलं.

नारळ काही लवकर फुटलेच नाही. कारण नारळ ओलं होतं. प्रसाद वाटला. तोरणाला बांधलेले फुगे मुलांनी फोडले. तोरण तोडले. त्यानंतर मंदिरात पुजेसाठी निघालो.

तान्हा पोळा आनंदाने साजरा केला. मी सुरू केलेली ही वार्डातील तान्हा पोळयाची प्रथा दरवर्षीच सुरू राहणार असं मला तरी उगीच वाटते.

00

दिवसागणीक मी वयाने, मनाने मोठा होतोय. तसच खूप विचार करतो. मनातल्या इच्छा आकांक्षा पूर्ण करण्यास मी धडपडतोय. आई

बाबांनी मडक्यागत आकार दिला. गुरूजनांनी ज्ञानाची धडे दिलेत. माझ्या पुढील आयुष्याला भरभरून शुभेच्छा मिळाल्यात.

मित्रांनो मी अगोदरच म्हटलय, ‘जीवन एक चक्रव्यूह आहे, ते भेदून काढायचं.’

कठीण परिस्थिती, येणारा पुढील अघटीत काळ यात रमायचं आहे. मनात येणाऱ्या विचारापेक्षा वाटेल तेवढं सोपं नाही. किर्तीवंत व्हावं असच वाटतय. ‘मरावे परी किर्तीरूपी उरावे’ ही म्हण आपणा सर्वांना लक्षात ठेवायची आहे. याकरीताच मी विचार करतोय. मी अजूनही बालक आहे. पुढील जीवनाचं कालखंड कसं असेल मलाही माहीत नाही. यश मिळावं, यशवंत व्हावं! कुणाची ईच्छा नसेल बरे! माझ्या अर्धवट प्राथमिक जीवनाची अर्धवट कहाणी........

पुर्ण यशदायी व्हावी. कल्पनेतील कॅक्टसला येणाऱ्या फुलाप्रमाणं, कधीही न आलेल्या उमरीच्या झाडाला फुल यावं. अपेक्षा बाळगतोय!

0000

## ई साहित्य प्रतिष्ठान

आता मराठी ई पुस्तकं तुम्ही www. esahity. com वरून डाऊनलोड करा.

किंवाesahity@gmail. com ला कळवून मेलने मिळवा.
किंवा7710980841हा नंबर सेव्ह करून या नंबरला तुमचे नांव व गांवWhatsapp करून पुस्तके whatsapp माग मिळवा.

किंवा ई साहित्यचे app. https://play. google. com/store/apps/details?id=com. esahity. www. esahitybooks या लिंकवर उपलब्ध आहे. तेdownload करा.

हे सव मोफ़त आहे.

आता ठरवलंय. मराठी पुस्तकांनी अवघं विश्व व्यापून टाकू. प्रत्येक मराठी सुशिक्षिताच्या मोबाईल मध्ये किमान पन्नास मराठी पुस्तकं असलीच पाहिजेत. प्रत्येक मराठी माणसाच्या! तुमची साथ असेल तर सहज शक्य आहे हे... कृपया जास्तीत जास्त लोकांना यात सामिल करून घ्या.

आपले नम्र

टीम ई साहित्य